# सुप्रीम कोर्टाने आणले ओबीसींचे भवितव्य धोक्यात!

## (पुर्वार्ध)

यशाला पायलीचे पंधरा बाप असतात, अपयशाच्या बारशालाही कुणी येत नाही. या म्हणीप्रमाणे गेल्या दोन दिवसांपासून एकमेकांच्या अभिनंदनाचा महापूर वाहतो आहे. सोशल मिडिया व टिव्ही चॅनल्सवर धुमाकूळ घातला जात आहे. अडगळीत पडलेले नेतेही ताजेतवाणे होऊन उठू लागलेत व श्रेयाचा गुलाल उधळू लागले आहेत. सामाजिक संघटना व राजकीय पक्षांचे कार्यकर्ते आपापल्या नेत्यांच्या गळ्यात हार घालत आहेत. वास्तविक ज्या नालायक राजकीय नेत्यांच्या नाकर्तेपणामुळे ओबीसी आरक्षण नाकारलं गेलं होतं, त्याच निकम्म्या नेत्यांनी या यशाचं श्रेय उपटायचं म्हणजे ‘चोराच्या उलट्या बोंबा झाल्यात’. **या यशासोबत ओबीसींवर नव्याने संकट येऊ घातलेले आहे, त्याची जबाबदारी कुणी घ्यायची? नेत्यांना हार-तुरे मिळाले कि ते कोंड्या-खूशाल होतात, सामान्य कार्यकर्त्यांनी मात्र लढतच राहायचे का?**

सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आणी ओबीसींचे राजकीय आरक्षण मोकळे केले. या निर्णयामुळे आता पहिल्यापेक्षा आरक्षित जागा कमी झाल्यात. नंदूरबार, पालघर व गडचिरोली जिल्ह्यात ओबीसी आरक्षण शुन्यावर आलं. परंतू सर्वच महाराष्टात आरक्षण शून्यावर गेलेला असतांना जे काही मिळाले आहे, ते पदरात पाडून घेतलं पाहिजे व पुढच्या लढाईला पुन्हा उभे राहिले पाहीजे, असे धोरण सामाजिक लढाईत स्वीकारले पाहिजे. विषम समाजव्यवस्थेत शोषितांना निर्भेळ शूद्ध असा न्याय कधीच मिळत नसतो. **एका यशाचा आनंद साजरा करीत असतांना त्याच यशातून पुढच्या लढाईचे प्रश्न उभे केले जातात. हा निकाल देतांना सुप्रीम कोर्टाने असाच उद्‌योग केलेला आहे.**

बांटिया आयोगाच्या कार्यपद्‌धतीला आम्ही आधीच आक्षेप घेतला होता व त्यातून ओबीसींची एकूण लोकसंख्या कमी दाखविण्याचे षडयंत्रही आम्ही उघड केलेले होते. ठाकरे सरकारला व नव्याने आलेल्या शिंदे-फडणवीसांच्या भाजपा सरकारला आम्ही सूचविले होते की,

1) बांटिया आयोगाचा अहवाल फेटाळून लावा. 2) समर्पित आयोगाच्या अध्यक्षपदावरून बांटियांची हकालपट्टी करा. 3) अभ्यासू व सेवानिवृत्त असलेल्या ओबीसी न्यायधिशांची अध्यक्षपदी नियुक्ती करा. 4) संबंधित कार्यक्षेत्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची समिति व त्याच क्षेत्रातील ओबीसींच्या आजी-माजी लोकप्रतिनिधींची समन्वय समिती स्थापन करा. 5) समन्वय समितीतील आजी-माजी ओबीसी लोकप्रतिनिधींना प्रत्येकी 5 हजार ते 25 हजार रूपयापर्यंत मानधन दिले पाहिजे. मराठा आरक्षणासाठी डेटा गोळा करणाऱ्या मराठा-ब्राह्मणांच्या बोगस संशोधन संस्थांना तत्कालीन मुख्यमंत्री असलेल्या फडणवीसांणी कोट्यावधी रूपये उधळलेत. मात्र ओबीसींचा डेटा फुकटात गोळा करायचा, हे कसे चालेल? 5) सरकारी समित्यांना व बिनसरकारी समन्वयकांना ईम्पिरीकल डेटा गोळा करण्याची शास्त्रशूद्ध पद्धत समजावून सांगण्यासाठी त्यांची संयुक्त अभ्यास-शिबीरे घ्या. 6) विभागीय शिबिरे घेण्यासाठी, इपिरीकल डेटाचे विश्लेषण करण्यासाठी लागणारे तज्ञ व त्यांना लागणाऱ्या साहित्य-सामुग्रीसाठी व मानधनासाठी किमान 435 कोटी रूपयांचा निधी द्या! 7) या कालावधित आणखी काही निवडणूका विदाऊट ओबीसी आरक्षण झाल्यात तर होऊ द्या, परंतू शास्त्रशूद्ध व अचूक पद्धतीने गोळा केलेल्या मजबूत डेटाच्या आधारावच ओबीसींना राजकीय आरक्षण मिळाले पाहिजे. अशा सुचना आम्ही बांटिया आयोग कार्यरत असतांनाच केल्या होत्या.

अशा प्रकारचा निर्णय ठाकरे-फडणवीस सरकारने ताबडतोब घेतला असता तर, ओबीसींची लोकसंख्या निश्चितपणे 60 टक्क्यांपेक्षाही जास्त सिद्ध झाली असती. हे मी अंदाजे-पंचे अ-तर्काने सांगत नाही आहे. याला शास्त्रशूद्ध असा पक्का पुरावा आहे. मध्यप्रदेश सरकारच्या विनंतीवरून केंद्र शासनाने त्यांना 2011 सालच्या एसईसीसी जनगणनेतील डेटा दिला आहे. या डेटाप्रमाणे मध्यप्रदेश राज्यातील ओबीसींची लोकसंख्या 50 टक्के सिद्ध झालेली आहे. **मध्यप्रदेश हे आदिवासीबहुल राज्य असूनही तेथील ओबीसींची लोकसंख्या जर 50 टक्के आहे, तर ओबीसी-बहुल महाराष्ट्रात ओबीसींची**

**लोकसंख्या ही निश्चितच 60 टक्क्यांपेक्षाही जास्त आहे.** एसईसीसी-2011च्या कायद्याप्रमाणे जी जनगणना झालेली आहे, ती शास्त्रशूद्धपणे घरोघरी जाऊन गोळा केलेल्या डेटावर आधारे सिद्ध केलेली आहे. महाराष्ट्रात आता फडणवीसांचे भाजपा सरकार आलेले असल्याने भाजपच्या केंद्रसरकारला हा डेटा द्यायला कोणतीही अडचण नसावी. **बांटिया आयोगामुळे मराठा आक्षणाचे भूत पुन्हा एकदा ओबीसींच्या छातडावर येऊन बसलेले आहे.** हे भूत खाली उतरवून कायमचे गाडायचे असेल तर तीनच मार्ग उपलब्ध आहेत. 1) 435 कोटीचा निधि खर्च करून समर्पित आयोगाकडून नव्याने शास्त्रशूद्ध पद्धतीने डेटा गोळा करणे, 2) केंद्राकडून एसईसीसी-2011च्या जनगणनेतील डेटा मिळविणे किंवा 3) बिहारप्रमाणे महाराष्ट्रातही जातनिहाय जनगणना करणे.

बांटिया आयोगाच्या अहवालावरील याचिकाकर्त्यांचे सर्व आक्षेप बाजूला सारीत सुप्रिम न्यायधिशांनी आरक्षण मंजूर केलं, **सुप्रिम कोर्टाला आरक्षण मंजुर करायची घाई का होती? नव्याने आलेल्या शिंदे-फडणविसांचा पायगुण चांगला आहे, असे सुप्रीम कोर्टाला सिद्'ध करायचे होते का?** एका हाताने राजकीय देता देता, दुसऱ्या हाताने ओबीसींचं नोकऱ्यातलं आरक्षण कमी करून ते मराठ्यांना देण्याचा घाट घातला गेला आहे का? कारण निकाल आल्याबरोबर अनेक मराठा नेत्यांच्या तोंडाला पाणी सुटले आहे. ओबीसींच्या ताटातील वरचा उरलेला तुकडा मागण्यासाठी मराठा नेत्यांची रांगच लागलेली आहे.

लोकसंख्येच्या निम्मे आरक्षण दिले पाहिजे, असा जावईशोध मराठा नेत्यांनी लावलेला आहे, तो त्यांच्यासाठी सोयीचा असला तरी संवैधानिक नाही. तसा कायदाही नाही व कोणत्या न्यायालयाच्या जजमेंटमध्येही कुठे म्हटलेले नाही. **उलट 'पुरेसे (पर्याप्त) प्रतिनिधित्व म्हणजे एडइक्वेट रिप्रेझेंटेशन' हा जो शब्द संविधानाच्या 15(4) व 16(4) कलमांमध्ये वापरलेला आहे, तो लोकसंख्येच्या प्रमाणाशी जोडलेला आहे. म्हणजे लोकसंख्येच्या प्रमाणाईतके आरक्षण दिलं तरच त्या समाजघटकाला पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल, असा त्याचा अर्थ होतो.** त्यामुळे ओबीसींची लोकसंख्या बांटिया आयोगाप्रमाणे 37 टक्के आहे, म्हणून ओबीसींचे 27 टक्के आरक्षण कमी करण्याची मागणी चूकीची

आहे. याउलट 37 टक्के ओबीसींना 37 टक्के आरक्षण दिले पाहिजे, असेच संविधान म्हणते.

मंडल आयोगाने जेव्हा ओबीसींची लोकसंख्या 52 टक्के ठरविली, तेव्हा '52 टक्के ओबीसींना 52 टक्के आरक्षण देण्याचीच शिफारस' केलेली आहे. परंतू सुप्रिम कोर्टाच्या 50 टक्क्यांची मर्यादा पाहता मंडल आयोगाला नाईलाजाने दलित+आदिवासींचे आरक्षण वगळून उर्वरित 27 टक्के आरक्षणाची शिफारस करावी लागली. 27 टक्के ही संख्या निम्मेकरणातून आलेली नसून सुप्रीम कोर्टाच्या 50 टक्के मर्यादेतून आलेली आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. पुरेसे पर्याप्त प्रतिनिधित्व (एडइक्वेट रिप्रेझेंटेशन) म्हणजे लोकसंख्येच्या प्रमाणात हा संवैधानिक कायदा लक्षात घेता, ओबीसींना त्यांच्या लोकसंख्येच्या टक्क्याईतके आरक्षण मिळाले पाहिजे. बांटिया आयोगाप्रमाणे ओबीसींची लोकसंख्या 37 टक्के असेल तर ओबीसींना 37 टक्क्याइतकेच आरक्षण मिळाले पाहिजे. **उद्या जर नव्याने सर्व्हेक्षण होऊन अथवा जातनिहाय जनगणना होऊन जर ओबीसींची लोकसंख्या 65 टक्के सिद्ध झाली तर ओबीसींना 65 टक्के आरक्षण द्यावे लागेल.**

झाले पाहिजे, मिळाले पाहिजे अशा प्रकारच्या भिकारचोट मागण्या आम्ही वारंवार का करीत असतो? संविधानाने आम्हाला सर्वकाही दिले आहे, परंतू प्रत्यक्षात पदरात काहीच पडत नाही. संविधानातील कायदे हे कागदावर आहेत. संविधान म्हणजे अशा कागदांचे बाईंडिंग केलेले पुस्तक आहे. **हे कागदावरचे कायदे प्रत्यक्षात व्यवहारात उतरावयाचे असतील व पदारात पाडून घ्यायचे असेल तर तामीळनाडूच्या धर्तीवर महाराष्ट्रातील ओबीसी चळवळ उभी करावी लागेल.** त्याचा वृतांत आपण उद्याच्या उत्तरार्धात पाहू या! तोपर्यंत जयजोती, जयजोती, सत्य कि जय हो!

**लेखक- प्रा. श्रावण देवरे**

**संपर्क मोबाईल- 88 301 27 270**

**ईमेल-** s.deore2012@gmail.com